स्थानिकांना भेडसावणारा प्रश्न म्हणजे प्रकल्पात उत्पन्न होणा-या राखेचा प्रश्न आहे. राख उडून पडते त्याचाच आम्हांला त्रास होतो. त्यासाठी आधुनिक प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात यावी. बाकी प्रदूषणाचा आम्हांला काहीही त्रास नाही. राख डोळ्यात गेली की डॉक्टरकडून उपचार घ्यावे लागतात. तरी राखेची विल्हेवाट शास्त्रीय पध्दतीने कशी लावण्यात येईल याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

पर्यावरण सल्लागार यांनी माहिती दिली की राखेची काळजी करण्याचे कारण नाही. कारण प्रकल्पातील चिमणीस (stack) ई.एस.पी. (Electro Static Precipitator) हे प्रदूषण नियंत्रण सयंत्रक बसविण्यात येणार असून त्याची कार्यक्षमता ही ९९.९९% एवढी आहे. साखर विभागातून, सहविद्युत प्रकल्पातून जी राख निघणार आहे, ती ईटीपीतील गाळ (स्लज) व प्रेस मडमध्ये मिसळून खत म्हणून शेतक-यांना देण्यात येईल. इन्सिनरेटर बॉयलरमधून जी राख मिळणार आहे, ती पोटॅशमुक्त असल्याने ती शेतक-यांना तसेत खत कंपन्यांना देण्यात येईल. राखेची शास्त्रीयदृष्ट्या विल्हेवाट लावण्याची काळजी कारखान्याने घेतलेली आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना,आक्षेप,टीकाटिप्पणी असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले.

२) **श्री नीतीन काकासाहेब जाधव, राहणार-चांदापुरी,तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-**

कारखान्यात उत्पादन प्रक्रियेत उत्पन्न होणारे सांडपाणी प्रक्रियेनंतर कारखान्यात वापरणार का स्थानिक शेतक-यांना उपलब्ध करुन देण्यात येणार?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की कारखाना ही झेडएलडी - शून्य द्रव निःस्सारण (Zero Liquid Discharge) तंत्रज्ञानावर आधारित आहे. प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही. कारखान्याभोवती व आजूबाजूच्या लोकांना सांडपाण्याचा त्रास होऊ नये व पर्यावरणाची हानी होऊ नये म्हणून झेडएलडी - शून्य द्रव निःस्सारण (Zero Liquid Discharge) प्रणालीची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

३) **श्री जयवंत श्रीराम शिंदे, राहणार-चांदापुरी, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-**

कारखान्यात सौर उर्जेचा वापर करण्यात येणार आहे का? प्रकल्पाच्या कार्यालयीन इमारतीवर सौर उर्जेची यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यातून उत्पन्न् होणारी सौर ऊर्जा ही कारखान्यातील

विविध घटकांसाठी वापरण्यात येईल. जेणेकरुन वीजेची बचत होईल व पर्यायी सौर उर्जेचा वापर योग्य प्रकारे होईल.

४) **श्री नामदेव तुका भगत, राहणार-निमगाव, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-**

कारखान्यात जे स्पेंट वॉश/औद्योगिक सांडपाण्याचा वापर कसा करण्यात येणार आहे?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की कारखान्यात उत्पन्न होणारा स्पेट वॉश-मळी ही एमईई - Multi-Effective Evaporator मध्ये घट्ट करण्यात येऊन इन्सिनरेशन बॉयलरमध्ये बगॅससोबत जाळण्यात येणार आहे.

५) **श्री दादा वामन फरतापे, राहणार-चांदापुरी,तालुका-माळशिरस,जिल्हा-सोलापूरः-**

आसवणी प्रकल्पामुळे कारखान्यास चांगला फायदा होईल. तरी आसवणी प्रकल्प लवकरात लवकर चालू व्हावा हीच आमची मागणी आहे.

६) **श्री जयवंत दत्तू सूळ, सरपंच, चांदापुरी ग्रामपंचायत, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-**

या प्रकल्पाचा चांदापूरी गावाला फायदा काय होईल त्याची माहिती देण्यात यावी व सदरहू प्रकल्प लवकरात लवकर चालू व्हावा हीच आमची मागणी आहे.

प्रकल्पाचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले की या प्रकल्पामुळे गेले दोन वर्षे ब-यापैकी फायदा झालेला आहे. मात्र नुसते साखरेचे उत्पादन घेऊन होणारा फायदा आणि साखरेबरोबरच सहविद्युत प्रकल्प व आसवणी प्रकल्प याचा फायदा यात बरीच तफावत आहे. यावेळेस प्रत्येक शेतक-याला टनाला फायदा झालेला आहे.

प्रकल्पात स्थानिक शेतक-यांची मुलेच कामाला घेणार असून आसवणी प्रकल्पातील मळी ही इंडियन ऑईल सारख्या कारखान्यात स्थानिक शेतक-यांच्या टँकर्सनेच पाठविण्यात येणार आहे. त्यामुळे या प्रकल्पाचा गावालाच फायद होणार आहे. त्याचप्रमाणे गावासाठी जो निधी वापरण्यात येतो, त्यात वाढ होऊन तो गावालाच वापरण्यात येणार आहे. या प्रकल्पाची आखणी अशी करण्यात आलेली आहे की त्यामुळे गावालाच फायदा होईल.

येथे परत आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप,टींकाटिप्पणी असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले.

